(57)

(५)

जन- 2-200(2)

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र. एमओएम/२५०१ दि. ०१.०४.२००४

विषय - महाराष्ट्र माहितीचा अधिकार
अधिनियम,२००२ ची बृहन्मुंबई
महानगरपालिकेत अंमलबजावणी.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ व दिनांक ११.८.२००३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेची आवश्यक माहिती जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक खाते/विभागाकरिता सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना माहिती अधिकाराबाबत विस्तृत माहिती मिळावी याकरिता शनिवार दिनांक २१.२.२००४ रोजी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत माहिती अधिकाराबाबत चर्चा करीत असताना बऱ्याच सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांनी माहिती अधिकाराबाबत अनेक शंका/अडचणी उपस्थित केल्या. त्याशिवाय काही माहिती अधिकाऱ्यांनी अधिनियमातील त्रुटी निदर्शनास आणून देऊन उपयुक्त सूचनाही केल्या. त्यावेळी अति.आयुक्त (शहर) यांनी सर्व माहिती अधिकाऱ्यांना माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीबाबत त्यांना येणाऱ्या अडचणी/शंका आणि महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमात जाणवत असलेल्या त्रुटी याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे लिखित स्वरुपात पाठवून देण्याच्या सूचना केल्या जेणेकरुन राज्य शासनाकडे पाठपुरावा करता येईल.

३. यास्तव सर्व सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना या परिपत्रकाद्वारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००२ ची अंमलबजावणी करताना कोणकोणत्या अडचणी/त्रुटी आढळून येत आहेत, याबाबतची माहिती तसेच अंमलबजावणीच्या बाबतीत काही उपयुक्त सूचना आपणास करावयाच्या असतील अशा सूचना रचना व कार्यपध्दती अधिकारी

(आयुक्तांचे कार्यालय) यांच्याकडे दि. १२.०४.२००४ पर्यंत पाठवाव्यात. विहित दिनांकापर्यंत सुचना प्राप्त न झाल्यास या बाबत आपणाकडून काहीही सुचना नाहीत असे गृहीत धरण्यात येईल.

| | |
|---|---|
| सही/-(१८.३.०४) | सही/-(२७.३.०४) |
| (एम.ए.खान) | (ए.जी.हिरे) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी(प्र) | उप आयुक्त (सामान्य प्रशासन)(प्र) |

प्रत : ———————————————— यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

रचना व कार्यपध्दती अधिकारी
(आयुक्तांचे कार्यालय)

C:\My Documents\MOM\Circular.doc

—o—